महाराष्ट्र पोलीस

Pune Police

सत्यमेव जयते

प्रेसनोट दि. २९/१/२०१७

**चॅन स्नॅचिंग व वाहन चोरी करणारे आंतरजिल्हा टोळीतील सराईत गुन्हेगारांना गुन्हे शाखा, युनिट ५ पुणे शहर यांनी केले जेरबंद.**

गुन्हे शाखा युनिट-५ पुणेचे हददीत सोन साखळी चोरीचे तसेच वाहन चोरीचे गुन्हे वाढल्याने मा. वरिष्ठांचे आदेशाने गुन्हे शाखा युनिट-५ चे कडील पोलीस स्टाफ परिणामकारक पेट्रोलींग करीत असताना सपोनिरी. महादेव वाघमोडे व पोलीस नाईक अंकुश जोगदंडे यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, चैन चोरी करणारा रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे- हैदर सरताज ईराणी रा. कोल्हापुर हा त्याचे साथीदारांसह बोपदेव घाट, येवलेवाडी मार्गे कोंढवा येथे त्याचे कडील निळे काळे रंगाची पल्सर मो.सा.नं. MH05-BZ-2383 वरुन व त्याचे आणखी साथीदार हे एक पांढरे रंगाची इनोव्हा कार घेवुन येणार आहेत अशी खात्रिशिर बातमी मिळाली.

सदरच्या माहिती प्रमाणे व.पो.निरी. एम.एम.मुजावर यांचे मार्गदर्शनाखाली युनिट- ५ कडील पोलीस स्टाफ यांनी बातमीप्रमाणे येवलेवाडी कमानीजवळ, कोंढवा पुणे येथे सापळा लावुन आरोपी नामे- १) हैदर ऊर्फ शब्बीर सरताज ऊर्फ सरदार इराणी /जाफरी वय- ३८ वर्षे रा. गांधी प्लॉट, रेल्वे स्टेशनजवळ, इराणी वस्ती, जयसिंगपुर, ता. शिरोळा, जि. कोल्हापुर २) दिलीप ऊर्फ दिलदार चौगंडा कांबळे वय-२५ वर्षे रा.मु.पो. पाण्याचे टाकीजवळ, माळबा, कुमळवाड ता. शिरोळा,जि. कोल्हापुर ३) स्वप्नील चंद्रकांत कांबळे वय-२० वर्षे रा.मु.पो. मोजे सांगाव, इंदिरानगर ता. कागल जि.कोल्हापुर ४) प्रमोद अशोक कांबळे वय-२९ वर्षे रा.मु.पो.रेंदाळ वटवाडी शेजारी, शाहुनगर ता. हातकनंगले जि. कोल्हापुर यांना एक निळे काळे रंगाची पल्सर व पांढरे रंगाची इनोव्हा कार सह ताब्यात घेतले.

त्यांचेकडे कौशल्याने, शिताफीने व विश्वासात घेवुन तपास करता त्यांनी चौघांनी मिळुन, शाहुपुरी सातारा येथे वेगवेगळया दोन ठिकाणी, दोन महिलांचे गळयातील दोन मंगळसुत्र हिसका मारुन चोरुन घेवुन गेले आहेत. त्यासाठी त्यांनी कोंढवा पोलीस स्टेशन पुणे येथुन चोरुन नेलेली बजाज पल्सर मोटर सायकल मुळ नंबर MH03-BX-4801 हीचा नंबर बदलुन तिला वेगळा .नं. MH05-BZ-2383 हा नंबर लावुन चैन स्नॅचिंग करीत होते. तसेच चैन स्नॅचिंग केले नंतर सापडु नये म्हणुन सोबत चारचाकी पांढरे रंगाची इनोव्हा कार नं. **MH09-BX-1966** हिचा पळुन जाणेसाठी वापर करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे. यातील आरोपी हैदर व त्याचे साथीदार यांचेकडे कौशल्याने तपास करुन दोन चैन स्नॅचिंगचे व दोन वाहन चोरीचे असे मिळुन एकुण-४ गुन्हे एघडकीस आणुन, एक पांढरे रंगाची इनोव्हा कार किंमत रुपये ७,००,०००/- ची व पल्सर मोटर सायकल किंमत रुपये १,००,०००/- ची व कल्याण आरटीओ कडील स्मार्टकार्ड असा **सर्व मिळुन ८,००,०००-०० चा** मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यातील हैदर ऊर्फ शब्बीर सरताज इराणी /जाफरी याचेवर यापुर्वी कोल्हापुर, ठाणे शहर येथे चैन स्नॅचिंगचे एकुण दहा गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी ही श्री. दिपक साकोरे सो. प्रभारी अपर पोलीस आयुक्त गुन्हे, श्री. पी. आर. पाटील पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री.अरुण वालतुरे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-२ यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट -५, पुणे कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. एम.एम.मुजावर, स.पो.निरी.महादेव वाघमोडे, स.पो.निरी.युवराज नांद्रे, पोलीस हवालदार लक्ष्मण शिंदे, प्रदिप शितोळे, प्रविण शिंदे, पोलीस नाईक भरत रणसिंग, अमजद पठाण, महेश वाघमारे, प्रविण काळभोर, प्रमोद घाडगे, गणेश बाजारे, अंकुश जोगदंडे, नामदेव आंगज, शिवाजी घुले, प्रदिप सुर्वे, मनोज साळुंखे, अजय खराडे, सचिन घोलप, संजयकुमार दळवी यांनी केली आहे.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक